Volume 8 (Special Issue 11)
April, 2018

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768







१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

# सामाजिक समतेचे प्रणेते - महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Editor : Dr. R.V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

Scanned by CamScanner

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal 29/99-1041

COSMOS IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768
Volume 8, Special Issue 11, April 2018
ISSN-2230-9578

१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

# सामाजिक समतेचे प्रणेते : महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**Special Issue Editor**

| Dr. Madhukar Desale | Prof. Gautam Thorat | Dr. Nishant Shende |
|---|---|---|
| Mahila College | Sarvajanik Arts & Comm College | G.T. Patil College |
| Nandurbar Dist. Nandurbar | Visarwadi Dist. Nandurbar | Nandurbar Dist. Nandurbar |

**Editor**

Dr. R.V. Bhole

**Editorial Board**

**Prin. Dr. A.T. Patil,** Sarvajanik Arts & Comm. College, Visarwadi Dist. Nandurbar
**Prin. Dr. A.S. Paithane,** V.V.M.'s Arts & Comm. College, Akkalkuwa Dist. Nandurbar
**Prin. Dr. D.S. Nikumbh,** ASC College, Chalisgaon, Dist. Jalgaon
**Dr. M.J. Raghuwanshi,** Vice Principal, G.T.P.College, Nandurbar
**Dr. Vijay G. Gurav,** Adarsh College of Arts, Nijampur-Jaitane
**Dr. Sunil V. Kuwar,** T.E.S.'s Mahila College, Nandurbar
**Dr. D.U. Rathod,** Nandinibai College, Jalgaon
**Dr. Vasudev Vale,** Arts, Comm. & Science College, Pachora Dist. Jalgaon

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrvb.com Visit - www.jrdrvb.com

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | प्रा.डॉ. सुनिल पानपाटील | डॉ.बाबासाहब आंबेडकर : भारतीय संविधान का निर्माण और राजभाषा हिंदी का प्रावधान | 74-76 |
| 22 | प्रा.डॉ युवराज वसंत पाटील | शिक्षण हे वाघिणीचे दूध - डॉ.बाबासाहेब आंबेडकर | 77-79 |
| 23 | प्रा.डॉ.सुनिल व्ही. कुवर | सत्यशोधक चळवळीतील महात्मा फुलेंचे योगदान | 80-83 |
| 24 | प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, म. फुले आणि भारतीय अर्थव्यवस्था | 84-87 |
| 25 | प्रा.डॉ.सौ. लता विलास गुप्ते | राजर्षी शाहू महाराज - सामाजिक क्रांतीकारक | 88-89 |
| 26 | प्रा. व्ही.जी. सोमकुवर | राजश्री शाहू महाराज यांच्या लोकोपयोगी कार्याचे ऐतिहासिक अध्ययन | 90-92 |
| 27 | प्रा. माधव शं. वाघमारे | राष्ट्रपिता म.फुले एक कृतिशील विचारवंत | 93-95 |
| 28 | प्रा. डी. आर. कोळी | महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार | 96-98 |
| 29 | दिपक बाबुलाल शिरसाट | महात्मा फुले यांचे वाड्मयीन कार्य | 99-101 |
| 30 | प्रा. योगेश जगन्नाथ कोरडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौध्द धर्म तत्त्वज्ञान | 102-104 |
| 31 | प्रा. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे | सत्यशोधक चळवळीला महात्मा फुलेंचे योगदान | 105-106 |
| 32 | KIRAN SURESH MARATHE | Contribution of Dr.Ambedkar towards women empowerment reforms in India through law | 107-110 |
| 33 | Prof. Bagul Jitendra Bhimrao | Dr. Babasaheb Ambedkar and his great contribution for labour welfare | 111-114 |
| 34 | अंजली लक्ष्मण जोडमोटे | राजर्षी शाहू महाराज यांचे दलितोत्थान / अस्पृश्यतेसंबंधी विचार व कार्य | 115-117 |
| 35 | प्रा. सुनिता संतोष पवार | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयक विचार | 118-119 |
| 36 | प्रा.डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे) | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य | 120-122 |
| 37 | प्रा. राहुल पुरुषोत्तम मंघे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणासंबंधी कार्य | 123-125 |
| 38 | प्रा.विलास कचरु पंडित<br>प्रा.डॉ. जितेंद्र श्यामसिंग गिरासे | देवदासी व इतर अनिष्ठ प्रथांनिर्मूलनात महात्मा फुलेंचे योगदान | 126-129 |
| 39 | प्रा. प्रवीण बाबूराव मोरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या संरक्षण विषयक विचार | 130-131 |
| 40 | प्रा.डॉ.सौ. सुषमा प्रमोद पाटील | शिक्षण व मानवता यांना जोपासणारे क्रांतिवीर महात्मा जोतीबा फुले | 132-133 |




Scanned by CamScanner

Journal of Research & Development Vol. 8 (Special Issue 11) April 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR - 4.270

# महात्मा फुले यांचे वाड्मयीन कार्य

**दिपक बाबुलाल शिरसाट,**
**मु. पो. गोंदेगांव, ता. जामनेर, जि. जळगांव**

म. फुले हे गेल्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील एक श्रेष्ठ समाजसुधारक म्हणून, श्रमजीवी वर्गाच्या सामाजिक व आर्थिक गुलामगिरीची व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची मिमांसा करुन त्यांच्या उध्दारासाठी प्रयत्न करणारे विधायक व क्रांतीकारी विचारवंत म्हणुन सुपरिचीत आहे.[१] सामाजिक कार्याची भूमिका मांडणारे, सृष्टिची निर्मिती निर्मिकाने केली मत सर्वसामार्थ्यांना समोर मांडणारे, स्वत:च्या मृत्युनंतर आपल्या देहावर कोणत्या प्रकारे संस्कार व्हावेत यांचा स्पष्ट उल्लेख पत्रात करणारे, म. फुले हे एक महामानव होते. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा व भोंदूपणा यावर त्यांनी आधूनिक विचारांच्या रुपाने मोठ्या प्रमाणात प्रहार केला होता. तत्कालीन समाजामध्ये शिक्षण घेण्याची प्रथा नव्हती. त्यांना शिक्षणाने मार्गाही उपलब्ध नव्हते तेव्हा त्यांनी शिक्षणाची एक नविन दिशा पुण्यात पाहिली मुलींची शाळा सुरु करुन दिली. विद्या ही मानवी जीवनात अत्यंत महत्वाची सुसंस्कारित बाब आहे. याचे महत्व त्यांनी सर्व सामान्यांना पटवून दिले. आपल्या वाड्मयीन कार्यातून संस्कृत मधील अतिशय अवघड साहित्यत्यांनी साध्या व सरळ भाषेत मांडले विद्येची ओळख करुन देतांना ते म्हणतात.[२]

"विद्येविना मती गेली मतीविना नीती गेली.
नीतिविना गति गेली गतिविना वित्त गेले.
वित्तविन शुद्र खचले अवघे अनर्थ एका अविद्येने केले. "

सर्व समजासाठी विद्या ही किती महत्वाची असते. एका अविद्येमुळे मानवी जीवन किती निरस होते हे त्यांच्या - एका विद्येविषयक धोतकातून दिसते. म. फुले यांचे औपाचारिक शिक्षण फारसे झालेले नसले तरी प्रत्यक्ष कार्यातुन आणि विविध प्रकारच्या ग्रंथ वाचनातुन त्यांचे व्यक्तिमत्व समृध्द झाले. घेते याचा प्रत्यय त्यांचे लेखन वाचतांना येतो. भारतीय इतिहास, पुराणे आणि धर्मशास्त्रविषय ग्रंथाचे वाचन तर त्यांनी केलेलेच होते. [३] परंतू इंग्रजीमध्ये प्रसिध्द झालेले ग्रंथही त्यांनी अभ्यासले होते. फुलेंनी सर्वसामान्यांच्या अंतकर्णात असलेल्या अज्ञानाला आपल्या लेखनीच्या ज्ञानरुपी शाईतुन सर्वसामान्यांना एकाच पगतीत उभे केले होते. स्त्रिया आणि शुद्रादीशुद्र प्रबोधन करून वर्णजाति स्त्रीदास्य अंताच्या लढा उभारुन त्यांना सर्वकष स्वांतत्र्य आणि मानवी हक्क प्राप्त करुन देणे आणि आधूनिक ज्ञान विज्ञानाच्या प्रवाहात आणून सोडते हे म. फुले यांच्या हे ईह वादी चळवळीचे उद्दिष्ट होते.[४] अशा चळवळीची तात्विक अधिष्ठान भक्कम करण्यासाठी त्यांनी वाड्मय निर्मिती केली त्यांच्या चळवळीतील दाहकता, विध्वंसकता तसेच वात्सल्य आणि रचनात्मका त्यांच्या वाड्मयात प्रतिबिंबित झाली आहे.[५] म. फुले यांच्या वाड्मयाचे प्रयोजन लोकरंजन, संपत्ती, किर्ती हे नव्हते. आत्मनिष्ठ शांत सुखायवादी लेखकाने नव्हते. लोकोध्दारासाठी जे जे शक्य आहे तेते केल्याशिवाय त्यांच्या मनाला व बूध्दीला स्वास्थता लागली नसती. तरीही त्यांनी जे केले त्याविषयी ते असामाधानिच होते.[६] असे फुले जीवनभर दूसऱ्यांच्य सुखासाठी अखंड झ ळत राहिले साहित्याच्या वाड्मयाच्या निर्मितीतून त्यांनी हे विचार सर्वसामाच्या पर्यंत पोहचवले ते पूढे म्हणाले माझ्या प्रयत्नांना थोडेसे यश आलेले तरी मला पाहता आले असते तर मरतांना समाधान वाटले असते. अपूरे राहिलेले कार्य आता तुम्हीच पूर्ण करावयाचे आहे, असे मत त्यांनी आपल्या कुटुंबियापुढे आणि अनुयांयापुढे अंत:काळी व्यक्त केले होते.[७] यातूनच साहित्याविषयी सर्वसामाजाविषयी त्यांच्या मनाची तळमळ सहाजिकत उपस्थित होते संतकवीचे अभंग आणि जोतिबाचे अखंड यामध्ये मात्र मूलभुत फरक आहे. फुल्यांनी आपले विचार प्रदर्शित कारकासाठी एक लोकप्रिय माध्यम म्हणुन साधन म्हणून एक अभंग सदृश्य पद्य प्रकारचा उपयोग केला.[८] आपल्य अखंड यांच्या माध्यमातुन अगदी साध्या सोप्या व घरगूती शब्दाच्या पाणाने हवा, तो विषय आशय विचार प्रकट करण्याचे आणि अगदी सहजतेने पोहचविषयाच्या फुले यांच्या प्रामाणिक प्रयत्न घेता.

जोतिबा फुले फारसे शिकलेले नव्हते पण बहूश्रृत होते. म्हणुनच त्यांना गुलामगिरी ब्राम्हणांच्या कावा आणि सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक अशी सारखी पुस्तके लिहता आली. [९] इ. स. १८२७ ते इ.स. १८९० हा त्यांच्या जीवनपट अनेकविधी घटनांनी भरलेला आहे. ते लेखनाकडे उशीरा वळेलेले असले तरी ते अगदी शेवटच्या घटकेपर्यंत लिहीत होते.



Scanned by CamScanner

त्यांच्या लेखनांच्या प्रेरणा समकालीन लेखनापेक्षा सर्वस्वी भिन्न होत्या या भिन्न प्रेरणांमुळेच त्यांच्या लेखनाचे बदललेले दिसते पांडित प्रदर्शन अगर घटापटीची चर्चा करणे त्यांना अभिप्रेत नव्हते सामान्य, शोषित माणसांची मुक्तता करणे हीच त्यांच्या लेखनाची प्रमुख प्रेरणा होती. ही बाब त्यांनी आपल्या गुलामगिरी च्या प्रस्तावनेत आहे. " तृतीय सत्य हे त्यांचे पहिले आणि एकमेव नाटक आहे. या नाटकातुन त्यांनी सामान्य माळ्या कुणब्यांना धर्मानिशाने कसे केले. याचे दर्शन घडविण्यात आले आहे म. फुले यांनी लिहलेला पहिला गद्य ग्रंथ म्हणजे (१८७३) हा होय. हा संवादात्मक पध्दतीने लिहलेला आहे यात धोंडीबा आणि जोतिबा यांच्या प्रश्नोत्तरातुन गुलामगिरी सिध्द झाला आहे.

म. फुले यांची स्वतंत्र ललित वाड्मयाची निर्मिती निश्चितच महत्वाची होती. या ललित शेतकऱ्यांचा असुड यासारख्या प्रदीर्घ निबंध त्यांनी लिहिला इशारा सारख्या अतिशय पोटतिडकीने लिहलेल्या मराठी वाड्मयात लक्षणीय ठरला." आपली वाड्मयातील भूमिका त्यांची कोठे फार स्पष्टपणे मांडली आहे असे आपण सर्वसामान्य माणसांसाठी लिहितो हे मात्र त्यांनी आवर्जून नोंदविले आहे. गुलामगिरी ग्रंथाच्या ग्रंथलेखनाचा हेतू म्हणजे ब्रम्हपीडेपासुन सुटणे हाच होय असे सांगतात आपल्या तिन प्रतिसंतनूच त्यांचे लेखनाची प्रेरणात दृष्टी सर्वकर्षाने जाणवते ते म्हणतात की विषमता करणाऱ्या माणसांबरोबर मी कुटुंबातील आवरण ठेवीन. अशी प्रतिज्ञा त्यांची केल्या होत्या.[१] सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथाचा प्रारंभ होतो तो मानव कशाने होईल या प्रश्नांपासुन आणि या प्रश्नाचे उत्तर दिले जाते ते सत्य वर्तनातून माणूस सूखी होतो. रामदासांच्या ओळींची यशवंत आठवण करुन देतो जगी सर्वसूखी असा कोण आहे. विचारे मना तूची शोधुनी फुले यांनी दिलेले उत्तर फार महत्वाचे आहे.[१] ते म्हणतात निर्मिकाने निर्माण केलेल्या पवित्र जगाविषयी आणि अज्ञानी शूद्रादि मनात विठ भरुन तो व्यर्थ आहे म्हणुन त्याने सर्वसंग त्याग करावा अशी परिभाषा त्यांनी केली यासाठी महत्वाचे की परमेश्वराने निर्माण केले जग हे उपभोग्यासाठी आहे, ते सोडून विरक्त होण्यासाठी नाही दृष्टि म. फुले व्यक्त करतात यालाच ऐहिक दृष्टि म्हणावयास हरकत नाही. म. फुले यांच्या दृष्टिने समाजात निच्च देव देवता मान्य नाही. भेदाभेद अंमगल हे त्यांनी जाणले होते. म्हणून निर्सगामध्ये समतेचो भावना माणसामाणसांमध्ये भेद असणे म. फुले यांना मान्य नाही. धर्म राज्य यासारख्या गोष्टीही त्यांना निरर्थक वाटत व्यक्तीच्या अंतकर्णात बसलेल्या एका निर्मिकाली ओळख घेवून फुले वसले होते. समाजातील कुठल्याही विविधअंगी व्यक्तीमध्ये निर्मिकाची ओळख त्यांच्या ज्ञानरुपी चकषूना झाली होती, असे म्हणव्यास काहिही हरकत एकंदरीत सर्व मानवी स्त्री - पुरुषाची कायिक मानसिक गुलागिरीतुन मुक्तता करणे आणि त्यांचे नैसर्गिक हक्क देण्यासाठी चळवळ संघटीत करणे हे त्यांच्या वाड्मयाचे प्रबोधन आहे. जनातील विचार हा त्यांच्या साहित्याच्या त्यांना समाजातील आणि साहित्याचा सौंदर्य शास्त्रातील वर्णजातिवर्चस्व आणि स्त्रीदास यांचे खंडण करावयाचे काळात फुले यांनी ब्राम्हण आणि त्यांचा धर्म रूढी, परंपरा यांच्याशी संघर्ष करावा लागला. एकदरीत सर्व मानवी पुरुषांची कायिक मानसिक गुलामगिरतून मूक्ता करणे आणि त्यांचे नैसर्गिक हक्क मिळवुन देण्यासाठी चळवळ करणे हे त्यांच्या साहित्याचे प्रयोजन आहे.[१] आजच्या आधूनिक काळात ते सर्वसामान्यापर्यंत पोहचविणे महत्वाचे आजच्या अज्ञानता, कुबूध्दी, कुविचार, कुसंग, कुवर्तन यासारख्या अमानवी कृत्यावर योग्य ते नियंत्रण ठेवणारे हत्यार फुले यांचे वाड्मयीन कार्य आहे. मानवी मनाच्या अंतकर्णात बोधरुपी ज्ञानाची निर्मिती करणारे ते त्यातुन समाजात एक ज्ञानरुपी मानव निर्माण होईल. असे म्हणण्यास हरकत नाही. अशी भविष्यकालीन दृष्टि यांच्या साहित्यातुन मिळते.

**निष्कर्ष :-**

महात्मा फुले यांचे वाड्मयीन निर्मितीची प्रेरणा विश्वमानवतेची आहे. अल्पसंख्य व वर्चस्व वादयांच्या सामाजिक गुलामगिरीत पडलेल्या समाजाला स्वंतत्र प्राप्त करुन देण्यासाठी त्यांची वाड्मयीन रुपी लेखनी महत्वाची होती. सर्व मानवतेला गुलामगिरीतुन व स्त्रियांना समान व सन्माचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी कृतिशिल होते. त्यांनी मानवी वर्ण जाती अहंकाराचा व पुरुषी मी पणाचा निषेध केला त्यांनी वाड्मय समाजाचे देश, भाषा आणि माणुस यांना प्रतिष्टीचे व्यासपिठ निर्माण करुन दिले. व्यक्ती व समाज वाड्मय आणि समाज





दृढ व अभिन्न असे आपल्या लेखनातुन दाखवून दिले. मा. फुले यांच्या वाड्मयाची प्रेरणा समाज हिताचे जाज्वल्य देशप्रेमाचे प्रतिक आहे.

**संदर्भ :-**


१. कुंडले म. बा. - शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र श्री. विद्या प्रकाशन पुणे - ११ वी आवृत्ती २०१२, पृ. क्रं. ६५८
२. कित्ता
३. कोतापल्ले नागनाथ - ज्योतीपर्व, स्वरुप प्रकाश औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती २०१०, पृ. क्रं. १८
४. गुंदेकर श्रीराम - महात्मा फुले विचार आणि वाड्मय प्रतिमा प्रकाश पुणे प्रथम आवृत्ती - १९९२, पृ. क्रं. १४३
५. कित्ता
६. तैत्रव - पृ. क्रं. १४३
७. तैत्रव - पृ. क्रं. १५०
८. वैद्य प्रभाकर - महात्मा फुले आणि त्यांची परंपरा लोक वाड्मय गृह प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती - १९७४, पृ. क्रं. २४८
९. ज्योतीराव फुले - समग्र ग्रंथ अधिकारी प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती - १९६३, पृ. क्रं. ४०
१०. उपरोक्त कोतापल्ले नागनाथ - पृ क्रं. १६
११. उपरोक्त कोतापल्ले नागनाथ - पृ क्रं. १२५
१२. उपरोक्त कोतापल्ले नागनाथ - पृ क्रं. १२६
१३. तैत्रव - पृ. क्रं. ११०
१४. तैत्रव - पृ. क्रं. २८
१५. गुंदेकर श्रीराम - महात्मा फुले विचार आणि वाड्मय प्रतिमा प्रकाश पुणे प्रथम आवृत्ती - १९९२, पृ. क्रं. १४६


-----------------------------*****-----------------------------



Scanned by CamScanner